महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# वैरणीची बचत





वैरणीच्या टंचाईमुळे दुष्काळी परिस्थितीत मौल्यवान जनावरे पशुपालकांना अनिच्छेने कवडीमोल किंमतीत विकणे भाग पडते. वैरण टंचाईमुळे बहुतांशी जनावरांना पोटभर चारा मिळत नाही, मात्र दुसरीकडे उपलब्ध वैरणीची अतोनात नासाडी होतांना दिसते. वाया गेलेली वैरण ग्रामीण भागात उकिरड्यावर हमखास आढळते. त्यामुळेच किफायतशीर दुग्ध व्यवसायासाठी पशुपालकांनी वैरणीचा उपयोग काटकसरीने करणे गरजेचे आहे.

## वैरणीच्या वापराबाबत महत्त्वाच्या बाबी

१. पशुपालकांनी गुरांपुढे एकदम वैरण घालू नये, दिवसातून चार ते पाच वेळा विभागून द्यावी.

२. गव्हाणीमध्ये उरलेली उष्टावळ वैरण झटकून दोन-चार दिवस उन्हामध्ये चांगली तापवावी. तापवितांना त्यावर मिठाचे पाणी शिंपडावे म्हणजे उष्टावळ चवदार होते. अशी वैरण भाकड जनावरांना भर म्हणून वापरावी.

३. मिठाच्या (१ ते २%) पाण्याचा शिडकावा मारलेली वैरण खाल्ल्यामुळे गुरे पोटभर पाणी पितात.

४. प्रत्येक गोठ्यात सुयोग्य गव्हाण/दावण असावी.

५. वैरण १ ते २ इंचाची कुट्टी करूनच द्यावी.

## वैरण कुट्टी करण्याचे फायदे

१. कुट्टी केलेली वैरण जनावरांना खाण्यास दिली तर वैरणीची नासाडी होत नाही.

२. वैरणीची मोठया प्रमाणात बचत होते.

३. वैरण जास्तीत जास्त प्रमाणात खाण्यायोग्य बनते.

४. वैरणीची पचनियता वाढते.

५. रवंथ करण्यासाठी जनावरांना अधिक वेळ मिळतो.

६. वैरण साठविण्यासाठी जागा कमी लागते.

७. साठवणुकीमध्ये वैरण खराब होण्याचे प्रमाण कमी होते.

८. कुट्टी केल्याने ४२ टक्के वैरणीची बचत होते, याचाच अर्थ दर दोन जनावरांमागे एका जनावराचा उदरनिर्वाह होऊ शकतो.

## वैरणीची कुट्टी कशी करावी ?

कुट्टी यंत्राचा वापर करावा. सिंगल फेजवर चालणारी किंवा हाताने चालविता येणारी कुट्टी यंत्रे बाजारात उपलब्ध आहेत. ताशी २०० ते ३०० किलो वैरण कुट्टी करण्याची क्षमता असलेले कुट्टी यंत्र १० ते १२ जनावरांसाठी पुरेसे ठरते.

**वापरा कुट्टी यंत्र । वैरण बचतीचे उपयुक्त तंत्र ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर